# ।। धिन धिनता को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## अथ धिन धिनता को अंग लिखंते ।।

।। साखी ।।

**धिन धिन ता को जन्म हे ।। ज्यांहा पद खोजो आय ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। रहया राम लिव लाय ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याने काळाच्या पलिकडील महासुखाचे पद शोधले व घटात प्रगट केले त्याचा मनुष्य देहाचा जन्म प्राप्त करणे धन्य आहे,धन्य आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जे स्त्री पुरुष ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती ,कुंटूब परीवार,धन,राज्यातून मोह काढून सर्व देवतांचा देव जो सतस्वरुप राम आहे, त्याच्याशी लिव लावतात ते सर्व स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।१।।

**धिन ग्यानी धिन सन्त वे ।। धिन ज्या चीन्हा राम ।।**
**धिन जनम सुखराम क्हे ।। जीवत पोथा धाम ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जगात ज्ञानी,संत अनेक आहेत परंतु ज्या ज्ञानी व संतांनी आदिपासून सर्व देवतांचा देव असा जो राम आहे,त्याला ओळखले आहे ते धन्य आहेत.तसेच त्या रामाचे स्मरण करुन जीवंतपणी काळरहीत महासुखाच्या निजधामाला पोहचले आहेत,त्यांचा जगात मनुष्य जन्म घेणे धन्य आहे,धन्य आहे.।।२।।

**धिन धिन सुण सोइ मन्ड मे ।। ज्हां मथ काढयो सार ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। लेवे तत बिचार ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,संसारात ज्या स्त्री–पुरुषांनी सर्व धर्मांचा, सर्व पंथांचा तसेच सर्व ज्ञान,ध्यानाचे मंथन करुन जीभेने रामनाम रटून काळाला सहजात मारता येते हा सार शोधला आहे,ते सर्व स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे व जे स्त्री,पुरुष राम नाम या सार शब्दाला ग्रहण करतात व ग्रहण करुन काळाला मारतात ते सर्व स्त्री,पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।३।।

**धिन धिन सो संसार मे ।। जिण घट ब्रम्ह गिनान ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। दिये भ्रम सब भांज ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतस्वरुप ब्रम्हज्ञान ज्या स्त्री–पुरुषाच्या घटात प्रगट आहे ते धन्य आहे.त्रिगुणी मायेचे सुख सदा व तृप्त आहे या भ्रमात अटकून गेले होते परंतु सतस्वरुप विज्ञान शोधल्यावर तीन लोकाचे सर्व सुख अतृप्त आहे व खोटे आहे तसेच सतस्वरुपाचे सुख सत्य आहे,तृप्त आहे हे समजून जातात व समजल्यावर त्रिगुणी मायेच्या विध्या त्यागून सतस्वरुपाची विधी धारण करतात,ते सर्व ज्ञानी,स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।४।।

**धिन धिन सो संसार मे ।। ज्यां शिर सतगुरू होय ।।**

फिर धिन सो सुखराम क्हे ।। तत कण लीयो जोय ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,संसारात अनेक स्त्री-पुरुष,ज्ञानी, ध्यानी आहे परंतु ज्याने आपल्या शिरावर आवागमनातून मुक्त करवून देणारे सतगुरु धारण केले आहे ते धन्य आहे,धन्य आहे तसेच अशा सतगुरुकडून भेद धारण करुन तत्तकण म्हणजे सदा सुख देणाऱ्या सतस्वरुप ब्रम्हला घटात प्रगट करवून चुकले आहे ते धन्य आहे,धन्य आहे.।।५।।

धिन धिन ज्यां कू गुर मिल्या ।। सतगुरू समरथ आय ।।
आतम मे सुखराम क्हे ।। दिन्हा ब्रम्ह बताय ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्यांना ज्यांना काळाच्या दु:खातून सदाकरीता मुक्त करुन देणारे सतगुरु मिळाले आहे ते धन्य आहे,धन्य आहे.अशा सतगुरुच्या शरणात गेल्याने शिष्याच्या आत्म्यातच सतस्वरुप ब्रम्ह प्रगट होऊन जातो. अशा ज्या ज्या स्त्री-पुरुष,ज्ञानी,ध्यानींनी सतगुरुचा शरणा धारण करुन आत्म्यातच परमात्मा ब्रम्ह प्रगट केला आहे,ते सर्व धन्य आहे,धन्य आहे.।।६।।

धिन धिन निर्गुण ओळख्यो ।। ईण काया के माय ।।
फिर धिन सो सुखराम क्हे ।। उलट गिगन घर जाय ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती हे सगुणी देवता,ज्या निरगुण रामजीची भक्ती करतात,अशा रामजीला ज्यांनी ज्यांनी आपल्या कायेत प्रगट केले आहे ते सर्व धन्य आहे,धन्य आहे आणखी कोण धन्य आहे तर जो सतगुरुचा शरणा धारण करुन आपल्याच कायेत स्वर्गाच्या रस्त्याने उलटून स्वर्गादिकाच्या पलीकडे गगनात जाऊन घर केले आहे.।।७।।

धिन धिन सो नर धिन्न हे ।। ज्या रे जन को लाड ।।
फिर धिन सो सुखराम क्हे ।। मुख रसणां लिव गाढ ।।८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्यांना काळापासून मुक्त करवून देणाऱ्या सतगुरुशी भाव व प्रित येते,ते सर्व स्त्री-पुरुष,ज्ञानी,ध्यानी धन्य आहे,धन्य आहे.पुढे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे स्त्री-पुरुष,ज्ञानी,ध्यानी मुखाने म्हणजे रसनेने पक्की लिव लावून रामनामाचे स्मरण करतात ते सर्व धन्य आहे,धन्य आहे.।।८।।

धिन धिन सो संसार मे ।। ज्यां घट दया संतोष ।।
फिर धिन सो सुखराम क्हे ।। दे जीवा दिल पोष ।।९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,परदु:ख,परकष्ट पाहून त्या जीवांना कष्टातून मुक्त करण्याची ज्यांच्या घटात दया येते,ते सर्व स्त्री-पुरुष धन्य आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,परमात्म्याने सुख दु:खात जसेही ठेवले आहे

त्याच्यात संतोष आहे असे स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे स्त्री–पुरुष मनात कोणत्या कारणाने घाबरुन गेले आहे,अशा घाबरलेल्या जीवाला भयरहीत करुन धिर देतात,ते सर्व स्त्री,पुरुष धन्य आहे,धन्य आहे. ।।९।।

**धिन धिन सो नर धिन्न हे ।। सो गुण ग्राही होय ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। झूट न बोले कोय ।।१०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे स्त्री–पुरुष परदु:ख देणारे आपले अवगुण त्यागतात व परसुख देणारे दुसऱ्यांचे गुण धारण करतात.ते सर्व स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे स्त्री–पुरुष नेहमी सत्य बोलतात व दु:खाने विवश झाल्यावरही थोडेसेही खोटे बोलत नाही,ते सर्व स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।१०।।

**धिन धिन से नर जाणीये ।। ज्यां घट हर भे होय ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। आसा रखे न कोय ।।११।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्या स्त्री–पुरुषाच्या घटात नेहमी हरचे भय राहते ते स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे परत अधिक धन्य कोण आहे तर जे हर शिवाय अन्य देवी–देवता तसेच स्त्री–पुरुषापासून कोणत्याही प्रकारची सुख प्राप्त करण्याची तसेच दु:ख मिटविण्याची आशा ठेवत नाही.।।११।।

**धिन धिन सो नर धिन्न हे ।। ज्यां जाण्यो जुग झूठ ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। रहे कर्मा सू रूठ ।।१२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याने ज्याने या जगाच्या माया मोहाच्या सुखांना खोटे समजून त्यागले आहे व मायेचे ज्ञान,ध्यान,कर्मकांडाशी रुसून सतस्वरुपाचे ज्ञान धारण केले आहे ते स्त्री,पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।१२।।

**धिन धिन ता को जनम हे ।। सन्त सरावे आय ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। दुर्बल पूजे जाय ।।१३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे सतस्वरुपी संतांची शोभा करतात अशा स्त्री–पुरुषांचे जगात मनुष्य देह धारण करणे धन्य आहे,धन्य आहे.अधिक धन्य कोण आहे सत्यावर चालणाऱ्या जगाच्या दु:खीत,पिडीत स्त्री–पुरुषांना स्वत:च्या बळाने जितके जास्तीत जास्त बनते तितके सुख पोहचवतात.।।१३।।

**धिन धिन जनम संसार मे ।। हर गुण सुं माता ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। निजपद का दाता ।।१४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,संसारात जे जे हरीच्या गुणात मस्त

राहतात तसेच जीवांना मोह ममतेच्या भ्रमातून काढून निर्मल सुखांचे निजपद देतात ते स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।१४।।

**धिन धिन सो नर धिन्न हे ।। ज्याँ उर अणभे होय ।।**
**सब गेला सुखराम क्हे ।। बरण बतावे जोय ।।१५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्या स्त्री–पुरुषाच्या उरात अणभय देशाचा अनुभव आहे ते स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे तसेच जे स्त्री–पुरुष अणभय देशात पोहचण्याचा पश्चिम रस्त्याचा तसेच रस्त्यात येणाऱ्या प्रत्येक अड्थळ्यांचा काय उपाय आहे,याची तऱ्हे तऱ्हेने विधी सांगतात ते धन्य आहे,धन्य आहे.।।१५।।

**भ्रम कर्म निर्णो करे ।। काढे अर्थ बिचार ।।**
**धिन सोई सुखराम क्हे ।। बोहो नर उधरे लार ।।१६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे संत शिष्याच्या प्रत्येक भ्रमाचा तसेच प्रत्येक कर्मकांडाच्या दुःखाच्या परीणामाचा सतस्वरुप ज्ञानाने सुक्ष्महून सुक्ष्म निर्णय शिष्याला समजवितात ते संत धन्य आहे,धन्य आहे.त्या संताच्या बळाने अनंत स्त्री–पुरुषांचा उध्दार होतो.।।१६।।

**धिन जो दे उपदेस वो ।। धिन जो झेले आय ।।**
**धिन धिन सो सुखराम क्हे ।। निज पद रहया समाय ।।१७।।**

जे जे संत सतस्वरुप देशाचा उपदेश देतात ते सर्व धन्य आहे,धन्य आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशा सतस्वरुप संताचा उपदेश जे स्त्री–पुरुष धारण करतात,ते स्त्री–पुरुष काळाच्या दुःखाच्या पलीकच्या महासुखाच्या निजपदात सदा करीता सामावतात असे सर्व संत धन्य आहे,धन्य आहे.।।१७।।

**भक्त करे सो धिन हे ।। ऊँच निच के माय ।।**
**बिन भक्ति सुखराम क्हे ।। सब ही ध्रक कहाय ।।१८।।**

जे स्त्री–पुरुष चाहे उत्तम आचाराच्या घरात जन्मलेले असो किंवा नीच आचाराच्या घरात जन्मलेले असो परंतु काळापासून मुक्त होऊन महासुखाच्या पदात पोहचविणारी सतस्वरुप विज्ञानाची भक्ती करतात,ते धन्य आहे,धन्य आहे.जे सतस्वरुप भक्ती सोडून अन्य भक्ती करतात ते सर्व जरी उत्तम आचाराच्या घरात जन्मलेले असो किंवा नीच आचाराच्या घरात जन्मलेले असो काळाचा ग्रास बनतात म्हणून त्यांचा मनुष्य जन्म धारण करणे धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।१८।।

**सो राजा सुन धिन्न हे ।। न्याव करे तत्त जोय ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। दयावंत जो होय ।।१९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो राजा प्रजेच्या प्रत्येक दुःखावर

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

विचार करुन प्रजेला प्रत्येक प्रकारचे सुख पोहचवण्याचा न्याय करतो तसेच आपल्या राज्याच्या प्रत्येक प्राणीमात्राच्या दु:खाला समजून सुख पोहचविण्याची आपल्या उरात दया ठेवतो असा राजा दयावंत असतो म्हणून तो राजा धन्य आहे,धन्य आहे.।।१९।।

हाकम सोई धिन्न हे ।। सूंक न मान्डे हात ।।
फिर धिन सो सुखराम क्हे ।। मिथ्या करे न बात ।।२०।।

हाकम म्हणजे न्यायाधिश तो धन्य आहे,जो न्याय करण्यात दुधाचे दुध व पाणीचे पाणी वेगवेगळे करुन न्याय करतो.न्यायात थोडीशी ही खोट्याची होऊ देत नाही तसेच न्याय करण्याकरीता कधी कोणाकडूनही लाच घेत नाही तसेच कोणाच्या समोर लाच साठी हाथ पसरवत नाही तो न्यायाधिश धन्य आहे,धन्य आहे.।।२०।।

सो राजा फिर धिन्न हे ।। बूझे ग्यान विचार ।।
षट द्रसण सुखराम क्हे ।। पूजर पकडे सार ।।२१।।

जो राजा संताना त्रिगुणी मायेच्या पलीकडीचे सतस्वरुपाचे ज्ञान विचारतो व धारण करतो तो राजा धन्य,धन्य आहे तसेच जो राजा जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी,फकीर, ब्राम्हण या सहा दर्शनींना सतस्वरुप ज्ञान शोधण्याकरीता पूजतो व त्यांच्या ज्ञानाने सार रुपात प्राप्त केलेले सतस्वरुप ज्ञान सतगुरुकडून धारण करतो तो राजा धन्य आहे, धन्य आहे.।।२१।।

सो महाजन सुण धिन्न हे ।। घट तो देह न कोय ।।
लेबा धीन सुखराम क्हे ।। ले नही तोले लोय ।।२२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो व्यापारी आपला माल विकतांना मालाचा पूर्ण भाव घेतो व माल मोजून देते वेळी कमी देतो व खरेदी करते वेळी भाव कमी देतो व जास्त माल मोजून घेतो तो व्यापारी नीच आहे व जो व्यापारी माल विकतांना व माल खरेदी करतांना थोडीशीही फेरफार करत नाही तो व्यापारी धन्य आहे,धन्य आहे.।।२२।।

सो म्हेरी सुंण धिन हे ।। जे पतब्रता होय ।।
नर धिन सो सुखराम क्हे ।। जे हरी रत्ता ज्योय ।।२३।।

जी पत्नी पतीव्रता आहे तसेच आपल्या पतीला कोणत्या प्रकारचा धोका करत नाही,ती पत्नी धन्य आहे,धन्य आहे व जो पती शिलवान आहे व हरीमध्ये रचमच आहे,नीतिने संसार करुन रामजीच्या स्मरणात लीन आहे तो पती धन्य आहे,धन्य आहे.।।२३।।

धिन सो वे ही जाणीये ।। जे रत्ता रेमाण ।।
दूजा सबी सुखराम क्हे ।। नेहचे झूठ बखाण ।।२४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे स्त्री–पुरुष रहिमान म्हणजे रामजीत

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

लीन होऊन रहिमान म्हणजे रामजीचे स्मरण करतात,ते स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे. रहिमान म्हणजे रामजीला त्यागून अन्य देवतांच्या भक्त्यांमध्ये लीन आहे ते सर्व निश्चितच काळग्राभी आहे म्हणजे स्वत:ला काळापासून मुक्त करविण्यात खोटे आहे,अयशस्वी आहे.।।२४।।

**धिन धिन ब्राम्हण धिन्न हे ।। हर ही सूं राता ।।**
**साधू धिन सुखराम क्हे ।। जाचण नही जाता ।।२५।।**

जो ब्राम्हण रात्रंदिवस हर म्हणजे सतस्वरुप ब्रम्हमध्ये मस्त आहे,लीन आहे तो धन्य आहे,धन्य आहे तसेच जो गृहस्थी साधू कोणाच्या समोर स्वत: तसेच आपल्या कुटूंब परीवाराकरीता हाथ पसरवित नाही व मेहनत,कष्ट करुन आपला संसार चालवितो तो गृहस्थी साधू धन्य आहे,धन्य आहे तसेच वैरागी साधू तो धन्य आहे जो आपल्या गरजे पुरता सत परीवाराकडून मागतो व बिना गरजेचे कोणी जबरदस्तीने कितीही देतो तरीही घेत नाही,तो वैरागी साधू धन्य आहे,धन्य आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२५।।

**छत्री सोई धिन हे ।। बो खीम्यां कर जाय ।।**
**षट दरसण सुण साद सूं ।। निव चाले जुग माय ।।२६।।**

क्षत्रिय म्हणजे अनीतिच्या विरोधात लढणारा लढवय्या,जो क्षमा स्वभावाचा आहे तो धन्य आहे म्हणजे जो क्षत्रिय विनाकारणाने लहान–मोठ्या लढाईत भाग घेत नाही,सहन होते तो पर्यंत कितीही त्रास झाला तरीही लढाई,भांडण करत नाही व होऊ देत नाही. आपली चूक नसतांनाही व आपल्या देहाचे बळ जास्त असतांनाही भांडण तंटा होऊ नये म्हणून चूक स्वत:वर घेऊन घेतो तो क्षत्रिय धन्य आहे,धन्य आहे तसेच जो सहा दर्शनांपासून व संत साधूपासून ज्ञान सार समजण्याकरीता नम्र राहतो तो क्षत्रिय धन्य आहे,धन्य आहे.।।२६।।

**सुभ सुभ बाताँ जे करे ।। सो सब ही धिन होय ।।**
**पण साचा धिन सुखराम क्हे ।। जे हरी रत्ता जोय ।।२७।।**

जे स्त्री–पुरुष सतस्वरुप देशात पोहोचवणाऱ्या शुभ शुभ गोष्टी करतात ते सर्व स्त्री–पुरुष धन्य आहे,धन्य आहे परंतु खरे धन्य तर ते आहे जे सतस्वरुपाच्या शुभ शुभ कर्मा सोबत हरीमध्ये रचमचलेले आहे व रात्रंदिवस हरीचे स्मरण करतात ते शुभ शुभ कर्म करणाऱ्यांपेक्षा अधिक धन्य आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।२७।।

**वा जागां ही धिन हे ।। ज्याहां हर चरचा होय ।।**
**जे रत्ता हरी नांव सुं ।। तिण सम अवरन कोय ।।२८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जेथे सतस्वरुप रामजीची चर्चा चालते

ते घर धन्य आहे,ती जागा धन्य आहे,ते गाव,शहर धन्य आहे परंतु ज्या घराचे लोक किंवा गाव,शहराचे लोक रामजीच्या स्मरणात लागलेले आहे ते घराच्या,गावाच्या शहराच्या अन्य लोकांपेक्षा महान आहे.त्यांच्या सारखे त्यांच्या घरात,गावात किंवा शहरात कोणीही स्त्री–पुरुष नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२८।।

**धिन धिन वे नर जुग मे ।। रामस्नेही नाम ।।**
**फिर धिन सो सुखराम क्हे ।। वा बस्ती वो गाँम ।।२९।।**

जगात रामस्नेही व कर्मस्नेही राहतात.रामस्नेही म्हणजे कर्मातून सावरलेले व महासुखात सामाविलेले स्त्री–पुरुष असतात तर कर्मस्नेही हे काळाच्या जबड्यात गहरे(खोलवर) अटकलेले स्त्री–पुरुष असतात.रामस्नेही काळाच्या मुखात अटकलेल्या ब्रम्हा,विष्णू, महादेव, शक्ती, अवतार, दुर्गा, मुंबा, अंबा, भैरु, भोपा, पितर इत्यादीची भक्ती त्यागतात व ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती काळापासून मुक्त होण्याकरीता ज्या सतस्वरुप रामजीची भक्ती करतात ती भक्ती धारण करतात व कर्मस्नेही ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती ज्या रामाची भक्ती करतात ती त्यागतात व काळाच्या मुखात जकड्बंद झालेले ब्रम्हा,विष्णू, महादेव,शक्ती,अवतार,दुर्गा,मुंबा,अंबा,भैरु,भोपा,पितर इत्यादीची भक्ती करतात.अशा रामजीच्या भक्ती करणाऱ्यांना ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,देवी,देवता तसेच जगाचे सर्व स्त्री–पुरुष रामस्नेही नामाने जाणतात असे सर्व रामस्नेही धन्य आहे,धन्य आहे.असे रामस्नेही ज्या वस्तीत किंवा गावात राहतात त्या वस्तीला तसेच गावाला रामस्नेहींची वस्ती तसेच रामस्नेहींचे गाव म्हणून जगत जाणते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशा वस्ती व गावाला धन्य आहे,धन्य आहे.।।२९।।

**रामस्नेही बाजीया ।। प्रगटिया जुग मांय ।।**
**सो धिन हे सुखराम क्हे ।। मुख देखीजे जाय ।।३०।।**

जो मनुष्य रामस्नेही म्हणून जगात प्रगटतो असे मनुष्य धन्य आहे,धन्य आहे.असे रामस्नेही म्हणविणारे स्त्री–पुरुषाचे मुख म्हणजे दर्शन संसाराच्या सर्व स्त्री–पुरुषांनी घेतले पाहिजे.अशा रामस्नेहीचे दर्शन केल्याने दर्शन घेणारा धन्य होतो. ।।३०।।

**सतगुरू की सेवा करे ।। लेवे निर्गुण नाँव ।।**
**सो धिन्न हे सुखराम के ।। सुण ज्योरे सब गाँव ।।३१।।**

जे मनुष्य सतगुरुची सेवा करतात म्हणजे सतगुरुंनी सांगितले निरगुण नाव घेतात म्हणजे ज्या मायेच्या नावाने निरगुण शब्द,मुखाने न बोलले जाणारे नाव घटात प्रगट होते,असे नाव जपणारे स्त्री–पुरुष धन्य आहे हे सर्व गाववाले तसेच शहरवाले ऐका असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३१।।

**धिन धिन हर की भक्त हे ।। धिन जो करे ऊचार ।।**

धिन धिन सो सुखराम के ।। केवल ब्रम्ह बिचार ।।३२।।

जगात काळापासून सोड्वणारी सतस्वरुप हरची भक्ती धन्य आहे,धन्य आहे.अशा हरच्या भक्तीचे जे स्त्री-पुरुष उच्चारण करतात ते सर्व स्त्री-पुरुष धन्य आहे,धन्य आहे.जे स्त्री-पुरुष माया व काळाच्या पलिकडील केवल ब्रम्हची भक्ती करतात ते सर्व धन्य आहे,धन्य आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३२।।

धिन धिन सोई जाणीये ।। जो शिंवरे निजनांव ।।

तासू धिन सुखराम के ।। जो पहुँता ऊण गाँव ।।३३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे निजनाम म्हणजे हंसासोबत आदि पासून अंतपर्यंत जो परमात्मा रमतो आहे त्याचे नाव भजतात ते स्त्री,पुरुष धन्य आहे, धन्य आहे तसेच अधिक धन्य कोण आहे जो असे निजनाम जपून परमात्म्याच्या महासुखाच्या गावाला पोहचतात ते सर्व स्त्री-पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।३३।।

पूरब घाटे ऊतऱ्या ।। पिछम दिसा चड़ जाय ।।

सुखिया धिन धिन जुग मे ।। बेठा निज घर माय ।।३४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो हंस पूर्वेचे सहा कमळ उतरुन पश्चिमचे सहा कमळ छेदून दहाव्याद्वारात चढतात आणि दहाव्याद्वारात माया व काळाच्या पलिकडील निजघर जेथून पहिल्यांदा मायेमध्ये आले होते,अशा निजघरी पोहचून बसतात ते सर्व स्त्री-पुरुष या जगात धन्य आहे,धन्य आहे.।।३४।।

तिर्वेणी के ऊपरे ।। नव घर लंघे कोय ।।

सो नर जुग मे धिन हे ।। वा सम अवरन होय ।।३५।।

जे स्त्री-पुरुष गंगा,यमुना,सरस्वती या तिन्ही नद्यांच्या संगमाच्या पलिकडे नऊ घरातील तेरा लोक महामाया,प्रकृती,ज्योती,अजर,आनंद,वजर,इखर,अनहद,निरंजन,निराकार, शिवब्रम्ह,महाशुन्य पारब्रम्ह ओलांड्तात व सतस्वरुपाच्या देशात पोहचतात,हे सर्व स्त्री -पुरुष धन्य आहे,धन्य आहे.या स्त्री-पुरुषांसारखे जगात कोणतेही स्त्री-पुरुष असत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३५।।

त्रिबेणी नेणा बिचे ।। प्रगट केऊँ बजाय ।।

जन सुखदेवजी पोथियां ।। सतगुरू सोगन खाय ।।३६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री-पुरुषांना,ज्ञानी,ध्यानींना सांगतात की,मी सतगुरुची शपथ घेऊन सांगतो की,मी सतगुरुच्या प्रतापाने घटात डोळ्यांच्या मध्ये जो गंगा,यमुना,सुषमनाचा त्रिवेणी संगमाचा घाट आहे तेथे पोहचलो आहे,हे प्रगट व ठोकून ठोकून सांगून राहिलो आहे,हे जगाचे सर्व स्त्री-पुरुष,ज्ञानी,ध्यानी ऐका.।।३६।।

।। इति श्री धिन धिनता को अंग संपूरण ।।